# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/04/2023 (सोमवार) सकाळ


---

### पो.स्टे. बुट्टीबोरी हद्दीमधील आय पी एल क्रिकेट सट्टयावर धाड
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १५/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील बोथली फाटक शिवारातील उड्डाण पुलाचे खाली काही इसम हे चारचाकी वाहनात IPL मधील लखनऊ विरूद्ध पंजाब यांचेमध्ये खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग लावण्यावर अशा प्रकारचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने बोथली फाटक शिवारातील उड्डाण पुलाचे खाली सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) पंकज परसराम वाधवानी, वय ४७ वर्ष, रा. रा. महालक्ष्मी अपार्टमेंट दयानंद पार्क जवळ जरीपटका नागपूर २) अनिल मदनलाल अग्रवाल, वय ५४ वर्ष, रा. नेताजी चौक कामठी** हे मारूती स्विफ्ट कार क्र. MH-31/ DC-3144 मध्ये मोबाईल फोनवर IPL मधील लखनऊ विरूद्ध पंजाब यांचेमध्ये खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग लावण्यावर जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०२ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) मारूती स्विफ्ट कार क्र. MH-31/ DC-3144 किंमती अंदाजे ३,००,०००/—रू. २) रेडमी कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल किंमती अंदाजे ५०००/—रू. नोकिया कंपनीचा ॲडरॉईड मोबाईल किंमती अंदाजे ३०००/—रू. दोन नोकीया कंपनीचे साधे मोबाईल किंमती अंदाजे २०००/—रू. असा एकुण किंमती अंदाजे ३,१०,०००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोहवा. कावळे ब. नं. ४५१ मो. नं. ९९२३१९६१५४ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, महेश जाधव, पोलीस नायक मयुर ढेकले, सत्यशीर कोठारे, अमृत किनगे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.



## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा पुर्ती कंपनी धापेवाडा भडांगी रोडचे बाजुला कच्चा रस्त्याला पांदन रोड जवळ दिनांक १५/०४/२०२३ चे १८/३० वा. ते १६/०४/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संजय रूपराव ठाकरे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ बेल्लोरी ता. कळमेश्वर जिल्हा नागपूर याचा मोठा भाऊ मृतक नामे— विजय रूपराव ठाकरे, वय ४० वर्ष, रा वार्ड क्र. ३ बेल्लोरी ता. कळमेश्वर याला यातील **संशयित आरोपी नामे— १) शरद सुर्यभान ठाकरे, वय २८ वर्ष रा. पोस्ट वल्मी गाव बेल्लोरी ता. कळमेश्वर २) रूक्षपाल सेवकदास पाटिल, वय ३५ वर्ष पोस्ट वल्मी गाव बेल्लोरी त. कळमेश्वर ३) केशव दिलीप भोयर, वय २८ वर्ष रा. पोस्ट वल्मी गाव बेल्लोरी ता. कळमेश्वर_४) महिला मेघा विजय ठाकरे, वय ३३ वर्ष, रा. पोस्ट वल्मी गाव बेल्लोरी त. कळमेश्वर** यांनी फिर्यादीचे वहिनी मेघा हिचे सोबत असलेले अनैतिक प्रेम संबंधातुन फिर्यादीच्या मोठा भावाचा गळा आवरून खुन केल्याचा संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. शरद गायकवाड मो नं. ९९२३९८८२९२ पो.स्टे. कळमेश्वर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर